# वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयात कार्यशाळा

प्रतिनिधी । नाशिक

कर्मवीर काकासाहेब वाघ शिक्षण संस्थेच्या अभियांत्रिकी महाविद्यालयात यांत्रिक विभाग व आयएसएचआरएइ यांच्या संयुक्त विद्यमाने 'रिसेंट प्रॅक्टिस इन रेफ्रिजरेशन सिस्टिम' या विषयावर नुकतीच कार्यशाळा घेण्यात आली.

या कार्यशाळेचे उद्घाटन एसएचआरएइ यांचे प्रमुख अमर ग्रोअर, रौफ शेख, विभागप्रमुख मिलिंद मुरुगकर, प्रा. महेश शेलार, प्रा. शिवाजी काळे यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

कार्यशाळेत संजय निकम, सुरेश दीडमिशे, मधूर गायधनी यांनी रेफ्रिजरेशनमधील नवीन तंत्रज्ञान व बदल याबद्दल माहिती दिली. तसेच यावेळी विद्यार्थी व उपस्थितांनी विचारलेल्या प्रश्नांनाही मान्यवरांनी समर्पक उत्तरे दिली. मयूर पगारे व ऋतुराज पगारे यांनी या कार्यशाळेसाठी विशेष परिश्रम घेतले. कार्यशाळेत सुमारे १०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या विषयातील शिक्षकही यावेळी उपस्थित होते.

**दै.दिव्य मराठी दि.१४/०२/२०१८**

# के. के. वाघ अभियांत्रिकीच्या मॅव्हरिक स्पर्धेत विद्यार्थ्यांचे यश

**नाशिक** । के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयातील व्यवस्थापनशास्त्र विभागातर्फे 'मॅव्हरिक-२०१८'चे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवाचे उद्घाटन माजी विद्यार्थिनी व कॉर्पोरेट ट्रेनर श्वेता पिंगळे यांच्या हस्ते झाले. यावेळी प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर, समन्वयक प्रा. एस. एस. झवर, प्रा. अजिंक्य जोशी आदी उपस्थित होते. यावेळी पिंगळे यांनी सांगितले की, विविध स्पर्धांमध्ये सहभागी होऊन विद्यार्थ्यांनी संघर्ष करायला हवा. स्पर्धेतूनच यश मिळत असते, असेही त्या म्हणाल्या. यावेळी पोस्टर मेकिंग, प्रश्नमंजूषा, चेंज युवर लक, फोटोग्राफी, डॅझल अशा विविध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. या सर्व स्पर्धांमध्ये ३०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. विजेत्यांना प्रमाणपत्र व रोख पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना डोनेशन ड्राइव्ह हा अनोखा उपक्रम राबवला. यावेळी विद्यार्थी व प्राध्यापकांनी रोख रक्कम, जुने कपडे, सॅनिटरी पॅडस यांचे संकलन केले व ते आश्रमशाळेतील गरजू विद्यार्थ्यांना देण्यात येणार आहे. या कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ, विश्वस्त चांगदेवराव होळकर, अशोक मर्चंट, समीर वाघ, सचिव प्रा. के. एस. बंदी, प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर यांचे मार्गदर्शन लाभले.

दै. दिव्य मराठी, दि. १३-०२-२०१८

## वाघ अभियांत्रिकी शिक्षण संस्थेत काश्मीर समस्येवर चर्चा

लोकमत न्यूज नेटवर्क

**नाशिक :** राष्ट्रीय स्वाभिमान आंदोलन व एन.एस.एस. यांच्यातर्फे 'काश्मीर समस्या व उपाय' या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आंदोलन संयोजन पवन श्रीवास्तव यांनी काश्मीरमधील सद्य परिस्थिती व प्रसार माध्यमांमार्फत होत असलेला प्रचार याबद्दल माहिती दिली. तसेच देशाच्या विविध भागांत शिकत असलेल्या काश्मिरी युवकांबद्दल समाजाने सकारात्मक विचार करावा. ज्यामुळे काश्मिरी जनता व इतर भारतीयांत सलोखा निर्माण होईल. यावेळी अभिमन्यू कोहाड यांनीही काश्मीर समस्येवर आपले विचार मांडले. तसेच कलम ३७०चा काश्मीर समस्येतील निवारणासाठीच्या दोन्ही बाजू समजावल्या. अनेक अनुभव व उदाहरणांद्वारे त्यांनी सरकारच्या प्रयत्नांबदल माहिती दिली. त्यानंतर काश्मीरचे रहिवासी हमीद मलिक यांनी काश्मिरी जनतेच्या मनातील भारतीयांबदलच्या देशप्रेम, निष्ठा व अखंडता दाखवा, असे आवाहन केले. डॉ.अश्विनीकुमार भारद्वाज यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी मनीष मंजूळ, प्रकाश कोल्हे, प्रा अजिंक्य जोशी, समन्वयक डॉ.नानासाहेब गुरुळे आदी उपस्थित होते. खुशबू पठाण हिने कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. या उपक्रमास प्राचार्य नांदूरकर यांचे सहकार्य लाभले.

**दै. लोकमत, दि. ०९-०२-२०१८**

## वाघ कॉलेजात 'असेन्ड' महोत्सव

**म. टा. प्रतिनिधी, नाशिक**

के. के. वाघ इंजिनीअरिंग कॉलेजमधील एमसीए विभागातर्फे 'असेन्ड - २०१८' या दोन दिवसीय राज्यस्तरीय तांत्रिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. भारतीय संस्कृती या संकल्पनेवर हा महोत्सव आधारित होता.

यावेळी नेटविन इन्फो सोल्युशनचे सीईओ अरविंद महापात्रा यांची प्रमुख उपस्थिती होती. यश मिळवण्यासाठी कोणताही शॉर्टकट नसून विद्यार्थ्यांना स्वतः मेहनत घेणे आवश्यक असल्याचे ते म्हणाले. तसेच स्वतः व्यावसायिक बनण्याचा सल्लाही विद्यार्थ्यांना त्यांनी दिला. एमसीए विभागप्रमुख डॉ. व्ही. सी. बागल यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. एमसीए विभागाचे समन्वयक प्रा. एस. एस. झंवर यांनी विद्यार्थ्यांना अपयश हीच यशाची पहिली पायरी असल्याचे सांगितले. यावेळी क्विझ, पोस्टर, कोड बस्टर, काऊन्टर स्ट्राइक, सेल्फी मेनिया आदी स्पर्धा पार पडल्या. रविविध ठिकाणांहून विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभाग नोंदवला.

**दै.महाराष्ट्र टाइम्स**
**दि.२२/०२/२०१८**